



सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ४ • सोमवार दि.२१ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.


# एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयात १६ कोटी रुपयांचा अपहार



## २८० धनादेश संशयाच्या भोवऱ्यात;लिपिकाविरुद्ध गुन्हा दाखल

किनवट/प्रतिनिधी-आदिवासींच्या सर्वांग विकासासाठी आलेल्या विकास निधीत तब्बल १६ कोटी ३७ लाख ६६ हजार ९१२ रुपयाच्या कथित अपहार प्रकरणाने संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेलाच हादरा दिला आहे. केंद्रीय रिझर्व्ह फंडाच्या रक्कमेवर गंडा घातला आहे. या प्रकरणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील वरिष्ठ लिपिक भगवान डवरे विरुद्ध किनवट पोलीसात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. कार्यालयीन वर्तुळातून या काळ्या कमाईत डवरेचेच हात अडकले की अनेकांचे हात अडकणार हे पोलीस तपासातून समोर येणार आहे.

१ एप्रिल २०२४ ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत शासकीय निधीच्या व्यवहारात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप असून, याप्रकरणी वरिष्ठ लिपिक भगवान उद्धवराव डवरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदिवासी विकासाच्या नावाने आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा हिशेबच संशयाच्या भोवऱ्यात सापडल्याने आता केवळ एका कर्मचाऱ्यापुरता हा मामला मर्यादित राहणार की त्यामागे आणखी मोठी साखळी आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.या प्रकरणातील सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे २८० धनादेशांच्या कथित अनधिकृत व्यवहारांची नोंद समोर आल्याचा आरोप. शासकीय मंजुरी आणि अधिकृत प्रक्रियेच्या चौकटीला फाटा देत निधी वळवण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.



शासकीय कामांसाठी राखून ठेवलेला पैसा कथितरीत्या खासगी व्यक्ती, व्यावसायिक दुकाने आणि बिगरशासकीय घटकांच्या खात्यांकडे वळवण्यात आला, असा आरोप आहे. एवढेच नव्हे तर ५७ संशयास्पद व्यक्तींच्या नावावर सुमारे १३ कोटी रुपयांची रक्कम उचलण्यात आल्याचा आरोप असल्याने या व्यवहारांच्या मुळाशी जाणे तपास यंत्रणेसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. विशेष म्हणजे या व्यवहारांशी संबंधित नोंदी गायब असल्याचा आरोप आहे. सरकारी कागदपत्रे जर अचानक अदृश्य होत असतील, तर त्या कागदांपेक्षा त्यामागची माणसे शोधणे अधिक गरजेचे ठरते. त्यामुळे या प्रकरणात केवळ धनादेश कुणी लिहिले, एवढ्यावर तपास थांबण्याऐवजी धनादेश तयार करणारे, मंजूर करणारे, वटवणारे आणि पैसा स्वीकारणारे हात कोणते, याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

### आदिवासींच्या हक्काच्या पैशाचा हिशोब कोण देणार?

आदिवासी विकासाच्या योजना कागदावर रंगवून प्रत्यक्षात निधीचा प्रवाह दुसऱ्याच दिशेने वळत असेल, तर विकासाच्या घोषणा कितीही मोठ्या असल्या तरी तळागाळातील वास्तव बदलत नाही. त्यामुळे या प्रकरणात दोषी कोण, याचा निर्णय तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेतूनच होईल; मात्र शासकीय निधीच्या प्रत्येक रुपयाचा हिशेब सार्वजनिक यंत्रणेला द्यावाच लागेल. आता प्रश्न केवळ भगवान डवरे दोषी आहे का? की, कार्यालयातील अनेकांचे हात बरबटले याचा सोक्षमोक्ष पोलीस तपासातून समोर येणार का? असा सवाल या निमित्ताने समोर येतोय.

जुलै महिन्यात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचा पदभार स्वीकारल्यानंतर ***पान ४ वर***

## महापालिकेने वाटप केलेल्या ११ हजार प्रमाणपत्रांची चौकशी होणार-किरीट सोमय्या




नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रशासनाने जन्म व मृत्यूच्या प्रमाणपत्रातील नाव दुरुस्ती मधील गैरप्रकार झाला असून अशा ११ हजार प्रमाणपत्रांची चौकशी करणार असल्याचे महापालिका प्रशासनाने मान्य केले आहे. अशी माहिती भाजपचे नेते व माजी खा.किरीट सोमय्या यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली आहे.

जन्म-मृत्यू प्रमाणपत्रातील नावात दुरुस्ती प्रक्रियेत राज्यभरात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला आहे. नावात सुधारणा करण्याच्या प्रक्रियेत राज्य सरकारने नवीन मार्गदर्शक सुचना केल्या आहेत. गेल्या दोन ते तीन वर्षात नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत नावात सुधारणा करण्याच्या कारणावरुन ११ हजार प्रमाणपत्र देण्यात आली आहेत. या प्रमाणपत्रामध्येही मोठा गैरप्रकार झालेला असून या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी किरीट सोमय्या यांनी महापालिका प्रशासनाकडे केली. या ११ हजार प्रमाणपत्रातील चौकशीमुळे नावात दुरुस्तीच्या प्रक्रियेमध्ये नेमके काय घडले हे समोर येणे गरजेचे आहे. आतापर्यंत राज्यात ६० एफआयआर दाखल झाले आहेत. आतापर्यंत ५ लाख प्रमाणपत्र रद्द झाले आहेत. नांदेड शहरात बिएलओच्या चुकीमुळे जवळपास २५ हजार मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. काही बिएलओंनी घरी बसून काम केले असून खोटा अहवाल प्रशासनाकडे दाखल केला. त्यामुळे जवळपास २५ हजार मतदारांची नावे निवडणुकीच्या मतदार यादीतून वगळण्यात आली. याप्रकरणी आपण जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली असून तक्रार केली आहे. प्रशासनाने दोन बिएलओला निलंबित केल्याचे किरीट सोमय्या यांनी सांगितले. तत्पुर्वी किरीट सोमय्या यांनी भाजपच्या महापौर सौ.कविता संतोष मुळे यांची महापौर दालनात भेट घेवून चर्चा केली. यावेळी उपमहापौर दिपकसिंह रावत, स्थायी समितीचे सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेते ॲड.महेशकुमार कनकदंडे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## खा.शरद पवारांचा २८ सप्टेंबरपासून दुष्काळ दौरा

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील अनेक भागांत यंदा अपेक्षित पाऊस न झाल्याने दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली असून, या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार २८ सप्टेंबर रोजी दुष्काळी भागाचा दौरा करणार आहेत. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून शेतकरी आणि ग्रामीण जनतेच्या अडचणी जाणून घेण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार आहे.



राज्यातील दुष्काळी परिस्थितीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना आपापल्या जिल्ह्यातील दुष्काळी भागांचा दौरा करून परिस्थितीचा आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच संभाव्य दुष्काळाचा सामना करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांकडून उपाययोजनांची चाचपणी सुरू आहे.दरम्यान, काही दिवसांपूर्वीच शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली होती. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली होती. आता प्रत्यक्ष दुष्काळी भागात जाऊन परिस्थितीचा आढावा घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.

## भाविकांचा छळ किती दिवस?;गोबिंदबाग साहिब गुरुद्वाराचा रस्ता,शहराच्या वैभवावर प्रश्नचिन्ह





स.रविन्द्रसिंघ मोदी

नांदेड-नांदेड शहराचे वैभव म्हणून आपण येथील तीर्थस्थळ तख्त सचखंड श्री हजुरसाहिब गुरुद्वाराचा उल्लेख आपण करत असतो. शहराची शान म्हणून सतत याचा उल्लेख करत असतो. पण दूसरीकडे या तीर्थस्थळाच्या दर्शनासाठी येणाऱ्या देशाविदेशातील भाविकांना आपण काय सुविधा देत आहोत याची समीक्षा शहर प्रशासनाने आज परिस्थितित करायला हवी.

मुख्य गुरुद्वारा जवळच ऐतहासिक आणी सुंदर गुरुद्वारा श्री गोबिंद बाग साहिब विद्यमान आहे. या गुरुद्वाराला जाण्यासाठी गेट नंबर पाच पासून भगतसिंघजी मार्ग आणि पुढचा गुरुद्वारा पर्यंतचा रस्ता आपण एक उदाहरण म्हणून वरील विषयाशी निगडित चर्चा करू शकतो. मुख्य गुरुद्वारातून गोबिंदबाग साहिब गुरुद्वारा पर्यंतचा रस्ता वर्षानुवर्षे दयनीय स्थितित ठेवण्यात आला आहे. अनेक वेळा या रस्त्याविषयी तक्रारी थेट मनपा आयुक्तापर्यंत करण्यात आल्या आहेत. तरीपण येथील समस्या, आहे त्याच अवस्थेत आहेत. पुढे किती दिवस या समस्या त्याच आवस्थेत ठेवण्यात महानगर पालिका प्रशासनास यश येईल हे पाहायचे आहे. सुमारे तीनशे मीटर लांबीचा हा कच्चा आणी अपूर्ण रस्ता प्रलंबित समस्या आहे. पावसाळ्यात ह्या रस्तावर पाणी साचल्याने गुरुद्वाराच्या दर्शनासाठी भाविकांना पाण्यातून किंवा तीन फूटाच्या एका फूटपाथावरुन मार्ग शोधावा लागतो. येथील घाण पाहून भाविक नाकावर रुमाल लावण्यास बाध्य होतात. तेव्हा प्रश्न पडतो की, काय हेच आहे विश्वप्रसिद्ध तीर्थस्थळाच्या सुविधा? महानगर पालिका आयुक्तानी या प्रश्नाचे उत्तर द्यावे ही लोकांची व भाविकांची इच्छा आहे. गोबिंदबागचा रस्ता तयार करण्याची अनेक वेळा मागणी झालेली आहे. जेव्हा मागणी होते तेव्हा एक गाडी चुरा किंवा माती फेकून मनपा मोकळी होते.

वर्ष २००८ मध्ये साजरा करण्यात आलेल्या गुरुतागद्दी त्रिशताब्दी सोहळा निम्मित राबविण्यात आलेल्या गुरुतागद्दी विकास योजना मधील हा अपूर्ण ठेवण्यात आलेला रस्ता आहे. मुद्दामहून उपेक्षित ठेवलेला हा रस्ता. आज अठरा वर्षे झाली, हा रस्ता पेवर ब्लॉकचा असून ठीकठिकाणी खड्डे आणी असमतोलपणा असलेला कच्चा रस्ताच होय. गुरुतागद्दी विकास योजनेअंतर्गत शहरात दूरवर ३९ रस्ते तयार करण्यात आलेत. पण त्याच योजनेतील तीर्थक्षेत्राशी संबंधित हा अपूर्ण आणी उपेक्षित असा रस्ता मनपा प्रशासनावर प्रश्नचिन्ह अंकित करीत आहे. गुरुद्वाराच्या नावावर कोट्यावधीचा निधी मिळाला किंवा आणला गेला. पण प्रत्यक्षात गुरुद्वारा भोवतालचा विकासच अपूर्ण ठेवण्यात आला. ज्याची जवाबदारी वर्ष २००८ पासून तर आज पर्यंतच्या सर्व आयुक्तांची सिद्ध होते. अशा समस्यांकडे दुर्लक्ष का करण्यात येत आहे, त्याचे उत्तर नेमके कोण देणार? पुढे दसरा, दिवाळी आणी गुरु नानकदेवजी प्रकाशपर्व सारखे सण साजरे होणार आहे. या सणासुदित भाविकांच्या संख्येत मोठी वाढ होत असते. देशाविदेशातील भाविक येथे तीर्थयात्रा करण्यासाठी येतात. पण रस्त्यांवरचे उघडे गटार आणी साचलेले घाण पाणी पाहून सर्वांची मोठी निराशा होते हे वेगळ सांगण्याची गरज राहिलेली नाही. ***पान ४ वर***




# दुष्काळ सोडा,काजू-बदाम खा!

**''भाकरी मिळत नसेल तर ब्रेड-बटर खा!'' हा इतिहासातील प्रसिद्ध उपरोधिक संदर्भ सत्ताधाऱ्यांच्या असंवेदनशीलतेचे प्रतीक बनला. मराठवाड्यातील सध्याची दुष्काळी परिस्थिती पाहता त्याची नवी आवृत्ती जन्माला येते की काय, अशी परिस्थिती नांदेडमध्ये निर्माण झाली आहे. ''दुष्काळ सोडा, काजू-बदाम खा!'' राज्याचे कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांनी शनिवारी नांदेड येथे लातूर विभागातील दुष्काळाचा आढावा घेतला. बैठक झाली, अधिकारी उपस्थित राहिले, परिस्थितीचा आढावा घेण्यात आला आणि त्यानंतर मंत्र्यांनी शेतांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. मात्र या संपूर्ण दौऱ्यापेक्षा बैठकीतील काजू-बदामाच्या ताटाचीच चर्चा महाराष्ट्रभर झाली.दुष्काळाने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी भरवलेल्या बैठकीत अधिकाऱ्यांसाठी सुकामेवा ठेवला जातो, ही बाब शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरू शकते. त्यातच जबाबदारी झटकण्यासाठी ''सुकामेवा अधिकाऱ्यांनी आणला होता'' असा खुलासा सुरू झाला. पण शेतकऱ्याला त्यात रस नाही. काजू कोणी आणले, यापेक्षा शेतकऱ्याच्या घरात भाकरी आहे की नाही?, हा खरा प्रश्न आहे. म्हणूनच कृषिमंत्री जिथे गेले, तिथे शेतकऱ्यांनी त्यांना सांगितले. ''काजू-बदाम खा;पण शेतकऱ्यांना मदत करा!'' एका वाक्यात सरकारच्या संपूर्ण दुष्काळ व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उभे राहिले. दुष्काळाच्या या पार्श्वभूमीवर आणखी एक बाब अस्वस्थ करणारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषणाची एक क्लिप पुन्हा व्हायरल होत आहे. भविष्यातील पिढीला मराठवाड्यात दुष्काळ दिसणार नाही, अशा आशयाचे वक्तव्य त्यात आहे. आश्वासनांच्या वर्षावानंतरही मराठवाड्याच्या शेतकऱ्याला पुन्हा दुष्काळाच्या छायेत उभे राहावे लागत असेल, तर आश्वासनांच्या घोषणांपेक्षा त्यांच्या अंमलबजावणीचा हिशेब देण्याची वेळ आली आहे.याच ठिकाणी शेतकरी कर्जाचा प्रश्न अधिक गंभीर बनतो. गेल्या बारा वर्षांत उद्योग क्षेत्रातील थकीत कर्जांबाबत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी मोठ्या प्रमाणावर write-off केले आहेत. केंद्र सरकारच्या अधिकृत आकडेवारीनुसार २०१४-१५ ते २०२२-२३ या काळात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी एकूण १०.४२ लाख कोटींची कर्जे write-off केली. सरकारने मात्र स्पष्ट केले आहे की, write-off म्हणजे सरकारने केलेली कर्जमाफी नव्हे; बँकांच्या लेखाशास्त्रीय प्रक्रियेत थकीत कर्जे बुडीत खात्यातून कमी करण्याची ती प्रक्रिया आहे.मुद्दा शब्दांचा नाही; प्राधान्यक्रमांचा आहे.शेतकऱ्यांच्या बाबतीत केंद्र सरकारने गेल्या अनेक वर्षांत राष्ट्रीय पातळीवर व्यापक कर्जमाफी केलेली नाही. उलट शेतकऱ्यांच्या नावाने घोषणा झाल्या, आश्वासने दिली गेली; पण त्या घोषणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती झाली, किती शेतकऱ्यांना लाभ मिळाला, किती जण कर्जाच्या ओझ्यातून बाहेर आले, याचा ठोस हिशेब जनतेसमोर किती वेळा ठेवला गेला? उद्योग क्षेत्रातील मोठ्या थकीत कर्जांवर आर्थिक यंत्रणा प्रक्रिया करू शकते; मग कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांसाठी ठोस आणि दीर्घकालीन धोरण का असू नये? हा प्रश्न सरकारला टाळता येणार नाही.शेतकऱ्याला दुष्काळाच्या वेळी पंचनामे नकोत असे नाहीत; पण पंचनाम्यानंतर मदतही हवी. आढावा बैठक नको असे नाही; पण आढाव्यानंतर निर्णय हवा. घोषणा नको असेही नाही; पण घोषणेची अंमलबजावणी झाली पाहिजे. कारण शेतकरी घोषणांवर जगत नाही. तो पावसावर, पिकावर आणि सरकारच्या मदतीवर जगतो.नांदेडच्या बैठकीतील काजू-बदाम हा छोटासा प्रसंग वाटू शकतो. पण त्याने मोठा प्रश्न उभा केला आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या ताटात काय आहे आणि सत्तेच्या टेबलावर काय आहे? इतिहासातील ''भाकरी नाही तर ब्रेड-बटर खा'' हा उपरोध सत्तेच्या जनतेपासून तुटलेल्या मानसिकतेचे प्रतीक बनला. आज महाराष्ट्रात ''दुष्काळ सोडा, काजू-बदाम खा'' असा नवा वाक्प्रचार जन्माला येऊ नये. कारण शेतकऱ्याला काजू-बदाम नकोत; त्याला त्याच्या घामाला न्याय, पिकाला भाव आणि संकटात शासनाचा ठोस आधार हवा आहे.**

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा: सामाजिक परिवर्तनाचे केंद्र

गावाच्या विकासाचा पाया केवळ शाळेच्या इमारतीत नसतो; तो विद्यार्थ्यांच्या ज्ञानात, शिक्षकांच्या विचारात आणि समाजाच्या सहभागात घडत असतो.



राष्ट्राच्या विकासात समाजाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. काळ बदलतो, परिस्थिती बदलते, तंत्रज्ञान बदलते आणि त्याबरोबर समाजाच्या गरजाही बदलतात. मात्र, या बदलांच्या केंद्रस्थानी आजही शाळा आणि शिक्षक यांचे स्थान कायम आहे. विशेषतः ग्रामीण, दुर्गम आणि वाडी-वस्त्यांमधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही केवळ चार भिंतींच्या आत चालणारी शिक्षणसंस्था नसून, ती गावाच्या सामाजिक परिवर्तनाची महत्त्वाची केंद्रे आहेत. सुमारे सव्वीस वर्षांपूर्वी ग्रामीण प्राथमिक शाळेच्या सामाजिक भूमिकेवर मी लिहिलेला विचार आज पुन्हा आठवतो. त्या वेळी शाळेसमोर इमारत, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शैक्षणिक साधनांची कमतरता, पालकांचा सहभाग आणि ग्रामीण समाजातील शिक्षणाबाबतची जागरूकता ही प्रमुख आव्हाने होती. आज यातील अनेक प्रश्नांचे स्वरूप बदलले असले तरी शाळा समाजासाठी काय करते? आणि समाज शाळेसाठी काय करतो? हा मूलभूत प्रश्न आजही तितकाच जिवंत आहे. प्राथमिक शाळेत मुलाला अक्षरज्ञान मिळते; परंतु त्याचबरोबर त्याला स्वच्छतेची सवय, शिस्त, सहकार्य, समानता, पर्यावरणप्रेम, वैज्ञानिक दृष्टिकोन, लोकशाही मूल्ये आणि माणुसकीचे धडेही मिळतात. म्हणूनच प्राथमिक शाळा ही समाजाच्या भवितव्याची पहिली प्रयोगशाळा आहे.

आज राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान, विचारशक्ती, समस्या सोडविण्याची क्षमता, कौशल्याधारित व सर्वांगीण शिक्षण यावर विशेष भर दिला जात आहे. म्हणूनच आजच्या जिल्हा परिषद शाळेचा प्रश्न केवळ मुलांना पुस्तकातील धडा शिकवला का? एवढ्यावर मर्यादित राहता कामा नये. त्याऐवजी मुलांना शिकण्याची क्षमता मिळाली का? प्रश्न विचारण्याची सवय लागली का? स्वतः विचार करून निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली का? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. गावातील शाळा ही गावाची सामूहिक जबाबदारी आहे. शाळेची इमारत शासनाची असली, शिक्षक शासनाचा कर्मचारी असला आणि अभ्यासक्रम शासनाने ठरविला असला, तरी विद्यार्थी हा संपूर्ण समाजाचा असतो. त्यामुळे पालक, ग्रामपंचायत, माजी विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, स्थानिक नागरिक, शिक्षणप्रेमी आणि लोकप्रतिनिधी यांनी शाळेशी आपले नाते अधिक घट्ट करणे गरजेचे आहे.आज शाळा विकासासाठी केवळ आर्थिक मदतीपेक्षा विचारांची आणि वेळेची गुंतवणूक अधिक महत्त्वाची आहे. एखादा पालक मुलांना पुस्तक वाचून दाखवतो, एखादा माजी विद्यार्थी संगणकाचे ज्ञान देतो, एखादा शेतकरी विद्यार्थ्यांना शेतीची माहिती देतो, एखादा कारागीर पारंपरिक कौशल्य शिकवतोतेव्हा शाळा खऱ्या अर्थाने समाजाशी जोडली जाते. २००० सालच्या तुलनेत आजची शाळा पूर्णपणे बदलली आहे. मोबाईल, इंटरनेट, संगणक, डिजिटल वर्ग, शैक्षणिक व्हिडिओ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे ज्ञानाचे जग विद्यार्थ्यांच्या हातात आले आहे. महाराष्ट्रातही शिक्षणातील तंत्रज्ञान, डिजिटल साधने आणि शिक्षकांचे तंत्रज्ञान-कौशल्य वाढविण्याच्या उपक्रमांवर भर दिला जात आहे. परंतु येथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागेलतंत्रज्ञान हे शिक्षकाचा पर्याय नसून शिक्षकाच्या हातातील प्रभावी साधन आहे.मोबाईल असणे म्हणजे डिजिटल शिक्षण नव्हे आणि इंटरनेट उपलब्ध असणे म्हणजे ज्ञान मिळणे नव्हे. मुलाने तंत्रज्ञानाचा वापर कशासाठी, किती आणि कसा करावा, हे शिकवणे ही आजच्या शिक्षकाची नवी जबाबदारी आहे. उद्याच्या पिढीला कृत्रिम बुद्धिमत्तेची ओळख करून देताना तिच्याबरोबर मानवी बुद्धिमत्ता, विवेक, सर्जनशीलता, नैतिकता आणि माणुसकी यांचीही जपणूक करावी लागेल. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणात त्यांच्या घरातील भाषा आणि स्थानिक बोली ही अडचण नसून ज्ञानाची पहिली पायरी आहे. महाराष्ट्राच्या शालेय शिक्षणाच्या संदर्भात स्थानिक बोलीच्या आधाराने मराठीकडे विद्यार्थ्यांना सहज नेण्याच्या प्रयत्नांचाही उल्लेख सरकारी दस्तऐवजांत आढळतो. गावातील मुलाला त्याच्या शेताची, नदीची, मातीची, पिकांची, लोकपरंपरांची, सणांची आणि स्थानिक इतिहासाची माहिती असते. शिक्षकाने या अनुभवांना पाठ्यपुस्तकाशी जोडले, तर शिक्षण अधिक जिवंत होते.'माझे गाव हीच माझी पहिली प्रयोगशाळा ही भावना विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाली पाहिजे. प्राथमिक शिक्षकाची भूमिका आज पूर्वीपेक्षा व्यापक झाली आहे. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या भावनिक, सामाजिक आणि नैतिक विकासाचाही मार्गदर्शक आहे.एखाद्या मुलाच्या घरची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असू शकते. काही मुलांना शिकण्यासाठी अतिरिक्त आधाराची गरज असू शकते. काही मुले आत्मविश्वासाच्या अभावामुळे मागे राहू शकतात. अशा वेळी शिक्षकाने केवळ हा विद्यार्थी कमजोर आहे असे न म्हणता या मुलाला पुढे आणण्यासाठी मी काय करू शकतो? असा प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे.आजच्या शिक्षणव्यवस्थेत शिक्षक हा बदलाचा केंद्रबिंदू असल्याचे राष्ट्रीय पातळीवरील शैक्षणिक चर्चेतही अधोरेखित केले गेले आहे. प्रत्येक मूल सारखे नसते. कोणाचे गणित चांगले असते, कोणाला चित्रकलेची आवड असते, कोणाला खेळाची, कोणाला वाचनाची, तर कोणाला प्रयोग करण्याची.म्हणूनच प्राथमिक शिक्षण म्हणजे सर्व मुलांना एका साच्यात बसविणे नव्हे; तर प्रत्येक मुलामधील वेगळ्या क्षमतेचा शोध घेणे होय. परीक्षेतील गुण महत्त्वाचे आहेत; परंतु त्यापेक्षा महत्त्वाचे आहेमुलाला प्रश्न पडतात का? तो प्रश्न विचारतो का? चूक झाली तर पुन्हा प्रयत्न करतो का? दुसऱ्याला मदत करतो का? समाजाबद्दल संवेदनशील आहे का?हीच खरी शिक्षणाची कसोटी आहे. प्राथमिक शाळेतून स्वच्छतेचा संस्कार सुरू झाला, तर त्याचा परिणाम संपूर्ण गावावर होतो. शाळेतील स्वच्छता, पाणी बचत, वृक्षसंवर्धन, प्लास्टिकमुक्त परिसर, कचरा व्यवस्थापन, स्वच्छ शौचालये आणि पर्यावरणपूरक उपक्रम यांत विद्यार्थ्यांचा सहभाग असला पाहिजे.मुलांनी शाळेत शिकलेली एखादी चांगली सवय घरी नेली आणि पालकांनी ती स्वीकारली, तर शिक्षणाचा प्रभाव वर्गखोलीच्या बाहेर पोहोचतो.याच क्षणी शाळा सामाजिक परिवर्तनाचे केंद्र बनते. शासकीय शाळांबाबत समाजाचा विश्वास अधिक दृढ होणे ही आजची महत्त्वाची गरज आहे. शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण,पारदर्शकता, नियमित संवाद, विद्यार्थ्यांच्या प्रगतीची माहिती आणि पालकांचा सहभाग वाढला तर हा विश्वास निश्चितच मजबूत होऊ शकतो.

**पंडित पवळे**
शिक्षणयोगी,नांदेड.

शाळेच्या प्रगतीची जबाबदारी केवळ मुख्याध्यापक किंवा शिक्षकांची नसते. ही माझ्या गावाची शाळा आहे ही भावना प्रत्येक गावकऱ्याच्या मनात निर्माण झाली पाहिजे. कारण शाळा चांगली झाली तर गाव चांगले होते; गाव चांगले झाले तर समाज मजबूत होतो आणि मजबूत समाजातूनच सक्षम राष्ट्राची निर्मिती होते. सव्वीस वर्षांपूर्वी १६ ऑक्टोंबर २०२० रोजी दै.लोकतमसह अनेक वृत्तपत्रानी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या सामाजिक भूमिकेविषयी मांडलेला विचार आजही तितकाच महत्त्वाचा आहे. मात्र आज त्या विचाराला नवे तंत्रज्ञान,नवी शैक्षणिक धोरणे,डिजिटल साधने,कृत्रिम बुद्धिमत्ता, कौशल्याधारित शिक्षण आणि बदलते सामाजिक वास्तव यांची जोड मिळाली आहे.

आजची जिल्हा परिषद शाळा ही केवळ गरीबांच्या मुलांची शाळा अशी ओळख न राहता गुणवत्तापूर्ण, समावेशक, तंत्रज्ञानस्नेही आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाची शाळा बनली पाहिजे. शाळेच्या भिंतीवर मोठ्या अक्षरांत लिहिलेले ज्ञान हेच शक्तीचे साधन आहे हे वाक्य केवळ घोषवाक्य न राहता प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनात उतरले, तरच शिक्षणाचे खरे सार्थक होईल.कारण शाळा म्हणजे इमारत नाही, शिक्षक म्हणजे केवळ कर्मचारी नाही आणि विद्यार्थी म्हणजे केवळ परीक्षार्थी नाही.शाळा म्हणजे समाजाच्या उद्याची पेरणी,शिक्षक म्हणजे त्या पेरणीचा संस्कारशील शेतकरी,आणि विद्यार्थी म्हणजे उद्याच्या समाजाचे अंकुरलेले भविष्य!

# कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्रात मराठवाडा मुक्ती दिन साजरा




किनवट/प्रतिनिधी- स्थानिक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र किनवट येथे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती दिन व विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त विशेष व्याख्यान व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

७८ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, प्र.कुलगुरू डॉ.अशोक महाजन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.ज्ञानेश्वर पवार व प्रभारी अधिष्ठाता डॉ.चंद्रकांत बाविस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली किनवट येथील कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र येथे मराठवाडा मुक्ती संग्राम एक स्वातंत्र्यलढा या विषयावर बळीराम पाटील येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ.किशन मिराशे, सरस्वती महाविद्यालय येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ.रामकिशन चाटे यांचे मराठवाडा मुक्ती संग्रामातील क्रांतिकारकांची योगदान या विषयांवर दोन विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाडा मुक्ती संग्रामातील प्रेरणादायी इतिहासाचे पान दोन्ही व्याख्यानात उलगडण्यात आले त्याचबरोबर विविध क्रांतिकारकारक प्रसंग वत्यांचे महत्व या व्याख्यानांमधून मांडण्यात आले. केंद्राचे प्रभारी समन्वयक डॉ.सुनील व्यवहारे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. सह-समन्वयक प्रो.डॉ.सुरेंद्र शिंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा.श्रीराम पवार यांनी सूत्रसंचालन केले. केंद्रामधील एम एस डब्ल्यू व बीएसडब्ल्यू मधील विद्यार्थ्यांकरिता निबंध स्पर्धा रांगोळी स्पर्धा व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. प्रा.मंदाकिनी राठोड, श्रीमती आशा शिरपूरकर, प्रा.प्रीती देवस्थळे रांगोळी स्पर्धेचे परीक्षक म्हणून उपस्थित होते. डॉ.योगेश अंबुलगेकर, डॉ.प्रमोद राठोड, प्रा.चेतन जाधव, डॉ.प्रेमकुमार नाईक यांनी स्पर्धेचे आयोजन केले होते. विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

# गोरसेनेच्या मोर्चाची धास्ती?,माहूरमध्ये पोलिसांचा गराडा

**सरफराज दोसानी**

माहूर:इवळेश्वर येथील गोरसेनेचे कार्यकर्ते प्रफुल रमेश जाधव यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या अॅट्रॉसिटी प्रकरणाच्या तपासावर गंभीर आक्षेप घेत, गुन्हा मागे घेण्यासह संबंधित डीवायएसपी किरण भोंडवे यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, या मागणीसाठी सोमवार, दि.२१ सप्टेंबर रोजी गोरसेनेच्या वतीने माहूर येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. माहूर तालुका बंजारा बहुल असल्याने मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी होण्याची शक्यता गृहीत धरून पोलिसांनी बाहेरूनही मोठा बंदोबस्त मागविला होता. परिणामी, राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या पोलीस कार्यालयासमोर आंदोलनकर्त्यांपेक्षा पोलिसांचीच गर्दी अधिक दिसून आली.



दरम्यान, डीवायएसपीं विरोधातील आंदोलनाचे निवेदन स्वीकारण्यासाठी तहसीलदार सुनावणीच्या कामात व्यस्त असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे निवेदन स्वीकारण्याची जबाबदारी सहाय्यक महसूल अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली. प्रशासनाच्या या भूमिकेवर आंदोलनकर्त्यांमध्ये चर्चा रंगली.

या वेळी गोरसेनेचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य अॅड. प्रदीप राठोड यांनी प्रफुल जाधव यांच्या अटकेची प्रक्रिया, तपासाची कार्यपद्धती आणि न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान तपास अधिकाऱ्याच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप नोंदविला. त्यांच्या दाव्यानुसार, दि. ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला, तर सकाळी ११.३० वाजताच जाधव यांना अटक करण्यात आली. गुन्हा दाखल होण्यापूर्वीच अटक झाल्याचा आरोप त्यांनी केला.

जुन्या रास्ता रोको आंदोलनाचा राग मनात धरून सूडबुद्धीने कारवाई करण्यात आल्याचा आरोप करत, डीवायएसपी किरण भोंडवे यांच्यावर निलंबनाची कारवाई न झाल्यास यापेक्षा अधिक उग्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा अॅड. राठोड यांनी दिला.गोरसेनेचे नेते रवी खोला यांनी संविधानातील विविध कलमांचा दाखला देत प्रफुल जाधव यांच्यावरील अटक व दाखल गुन्हा अन्यायकारक असल्याचा आरोप केला. हा केवळ बंजारा समाजाचा अपमान नसून संविधानाचा अपमान असल्याचे ते म्हणाले.

पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याऐवजी दोन समाजांत तेढ निर्माण करण्याचे पाप करू नये. आमचा समाज ऊसतोडणी करणारा समाज आहे. आमच्यावर अन्याय झाल्यास तो सहन केला जाणार नाही. कोयता हातात घेऊन पुन्हा मोठे आंदोलन करावे लागेल, असा इशारा रवी खोला यांनी दिला.या वेळी नांदेड जिल्हा गोरसेना अध्यक्ष किशोर चव्हाण आणि यवतमाळ जिल्हा अध्यक्ष अतुल राठोड यांनीही आक्रमक भाषणे केली. त्यानंतर आंदोलनकर्त्यांच्या वतीने प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले.

गोरसेनेने केलेल्या आरोपांबाबत आंदोलनस्थळी उपस्थित पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्याकडे विचारणा करण्यात आली. मात्र, या प्रकरणाचा तपास आपल्या हातात नसल्याचे सांगत, गुन्हा दाखल होण्याची वेळ आणि अटकेची वेळ यावर भाष्य करण्याचे त्यांनी टाळले. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असून, कारवाई योग्य की अयोग्य, हे न्यायालय तपासेल, अशी भूमिका त्यांनी मांडली.आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

जावक क्र./जे-३/२५१४/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड
जिजामाता चॅरिटेबल ट्रस्ट इमारत, रेल्वे स्टेशन समोर, नांदेड
दिनांक :- १४/०८/२०२६

Notice of Inquiry
(Form No.2)

**चौकशीची जाहीर नोटीस**

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालय,नांदेड विभाग,नांदेड.
सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९

**अर्ज क्रमांक/चौकशी क्रमांक :- १२४४/२०२६**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- **न्यु समृद्धी चॅरिटेबल ट्रस्ट, लादगा ता.मुखेड जि.नांदेड**

**अर्जदार - सहदेव व्यंकटी सोनटक्के**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त नांदेड, हे वर नमूद केलेला अर्ज या संबंधी सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

१. वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

२. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मालमत्ता :- रोख रक्कम रु.७०००/-

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा द्यावयाचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांचे आत कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १४/०८/२०२६ रोजी दिली.

स्वाक्षरित/-
अधिक्षक (न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# देगलूर तालुक्यात ५० हजार हेक्टर वरील सोयाबीन करपले; शेतकऱ्यांचा आक्रोश

## कोरडा दुष्काळ जाहीर करुन मदत देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**नरसिंग अन्नमवार**

देगलूर-देगलूर तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसाने शेतकऱ्यांची अक्षरशा: परीक्षा घेतली आहे. सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी पदरमोड करून सोयाबीन कापूस, तूर, उडीद, मूग आणि इतर पिकांची लागवड केली. मात्र त्यानंतर पावसाने प्रदीर्घ उघडीप दिल्याने उभी पिके पाण्याअभावी करपली आहेत. विशेषता देगलूर तालुक्यातील हाणेगाव, करडखेड, शहापूर, मरखेल, माळेगाव, लोणी या परिसरातील तब्बल पन्नास हजार हेक्टर वरील सोयाबीन पिकाला मोठा फटका बसल्याचे शेतकरी सांगत आहेत.

पावसाच्या प्रतीक्षेत शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या होत्या काही दिवसापूर्वी झालेल्या सर्व पावसाने शेतकऱ्यांनी थोडी आशा निर्माण झाली होती मात्र अनेक ठिकाणी तो पाऊस पिकांना वाचविण्यासाठी पुरेसा ठरला नाही. परिणामी सोयाबीनच्या शेंगा भरण्याच्या काळातच पिके वाळून गेली. अनेक शेतामध्ये सोयाबीनचा रंग बदलला असून, काही ठिकाणी पिके पूर्णपणे करपल्याचे चित्र दिसत आहे. लागवडीचा खर्चही पाण्यात सोयाबीनसह, कापूस तू उडीद, मूग आणि इतर पिकावरही पावसाच्या खंडाचा विपरीत परिणाम झाला आहे. बियाणे, खते, औषधी, मजुरी, मशागत, पेरणी आणि इतर खर्च करून शेतकऱ्यांनी पिके उभी केली मात्र,



पावसा अभावी उत्पादन हातातून निघून गेल्याने लागवडीवर केलेला खर्चही वसूल होण्याची शक्यता कमी झाली आहे. उत्पादक शेतकऱ्यांनाही पावसाच्या खंडाचा फटका बसला आहे. तूर, कापूस, उडीद आणि मुग या पिकांची वाढ खुंटली असून काही भागात पिकांची अवस्था चिंताजनक आहे. त्यामुळे केवळ सोयाबीन पुरता नुकसानीचा विचार न करता सर्व खरीप पिकांची वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करण्याची मागणी होत आहे.

**पंचनामे कधी होणार?**

शेतकऱ्यांच्या शेतातील पिके डोळ्यादेखत करपले असताना प्रशासनाने प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीची पाहणी करावी, अशी मागणी शेतकऱ्याकडून होत आहे. गाव निहाय आणि शेती निहाय पंचनामे करून शासनाकडे तातडीने अहवाल पाठवावा, अशी अपेक्षा आहे. शेतकऱ्यांनी कोरडा दुष्काळ जाहीर करून तातडीने आर्थिक मदत द्यावी अशी मागणी केली आहे. मदत मिळण्यास विलंब झाल्यास पुढील रब्बी हंगामाची तयारी करणे ही शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान ठरणार आहे. कर्ज, खर्च आणि कुंटुबाचा भार: खरीप हगाम हातातून गेल्याने शेतकऱ्यांसमोर केवळ पिकांचे नुकसान नाही, तर संपूर्ण कुंटुबाचा आर्थिक भार उभा राहिला आहे. अनेक शेतकऱ्यांनी पीक उभे करण्यासाठी कर्ज काढले आहे. आता उत्पादनच मिळणार नसेल तर कर्जाची परतफेड, घरखर्च, मुलांची शिक्षण आणि पुढील शेतीचा खर्च कसा करायचा, हा प्रश्न शेतकऱ्यासमोर आहे.

**सोयाबीन तूर कापसाला फटका!**

पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणात करपले आहे. तूर आणि कापसाचेही वाढ खुंटली असून उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने केवळ एका पिकाचा विचार न करता संपूर्ण खरीप हंगामाचे पंचनामे करून सर्व पिकांना नुकसान भरपाई द्यावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

# खरीप हंगामावर दुष्काळाचे संकट

उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड तालुक्यात मागील दोन महिन्यांपासून पावसाने मोठा खंड दिल्याने खरीप हंगाम धोक्यात आला आहे. सप्टेंबर महिना पाण्याअभावी कोरडा गेला असून ऑक्टोबरमध्ये खरीप काढणीची लगबग असते, मात्र यंदा परिस्थिती अत्यंत बिकट आहे.

जून महिन्यात झालेल्या थोड्या पावसानंतर पुन्हा उष्णतेची लाट वाढली. जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस झाला, मात्र सर्वदूर ओढे, नाले कोरडेच आहेत. तालुक्यात सर्वत्र उष्णतेची तीव्र लाट निर्माण झाली आहे. पाण्याअभावी शेतकरी आपली पिके वाचवण्यासाठी उन्हातान्हात दिवसरात्र धावपळ करत आहे. ज्यांच्याकडे स्वतःची विहीर, बोअरवेल आहे, त्यांनाही वेळेवर वीज मिळत नसल्याने दुहेरी संकटाचा सामना करावा लागत आहे. तालुक्यातील सोयाबीन, कापूस, उडीद, मूग, ज्वारी, हळद, भाजीपाला आणि ऊस ही मुख्य पिके आहेत. गेल्या ३० दिवसांपासून पिकांना पाणी न मिळाल्याने पिके करपून जात आहेत. हिरवीगार असलेली सोयाबीनची पिके पिवळी पडून त्यावर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाला असून, पीक संपूर्णपणे उद्धस्त होण्याच्या मार्गावर आहे. लाखो रुपये खर्च करून केलेल्या शेतीची पाण्याअभावी माती होत असल्याने शेतकऱ्यांच्या आशा मावळल्या आहेत. या पार्श्वभूमीवर उमरखेड कृषी विभागाने तात्काळ शेतात जाऊन पंचनामे करावेत आणि उमरखेड तालुका कोरडा दुष्काळ म्हणून जाहीर करून सरसकट नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

# वैज्ञानिक दृष्टिकोनातूनच अवकाश संशोधनाला नवी दिशा मिळेल-ॲड.प्रदीप नागापूरकर




नांदेड/प्रतिनिधी- भारताने अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात जगाचे लक्ष वेधून घेतले असून, या प्रगतीला पुढे नेण्यासाठी विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकी ज्ञानावर न थांबता प्रश्न विचारण्याची, प्रयोग करण्याची आणि नवनवीन संशोधनाची जिज्ञासा जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर यांनी केले. राष्ट्रीय अवकाश दिनानिमित्त सायन्स कॉलेजमध्ये आयोजित निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते.

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेज, नांदेड येथे इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड स्टार्ट-अप सेलच्या वतीने राष्ट्रीय अवकाश दिन २०२६ निमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि अंतराळ विज्ञानाविषयी जिज्ञासा निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा उद्देश होता. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन गटातून ५० हून अधिक निबंध प्राप्त झाले. ॲड. नागापूरकर यांनी भारताच्या चांद्रयान, मंगळयान आणि आदित्य-एल १ यांसारख्या अंतराळ मोहिमांचा संदर्भ देत विद्यार्थ्यांनी भारताच्या अंतराळ क्षेत्रातील प्रगतीचा अभ्यास करावा, असे आवाहन केले. माहिती मिळविणेपेक्षा नवीन ज्ञान निर्माण करणे ही संशोधनाची खरी दिशा आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. लक्ष्मण शिंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. प्रदीप नागापूरकर, विशेष व्याख्याते व निबंध स्पर्धेचे परीक्षक डॉ. निलेश इंगळे, उपप्राचार्या प्रा. अरुणा शुक्ला आणि संयोजक डॉ. विजयकिरण नरवाडे उपस्थित होते. डॉ. निलेश इंगळे यांनी भारताचा अंतराळ विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रवास या विषयावर विशेष व्याख्यान देताना भारताच्या अंतराळ संशोधनाची वाटचाल, विविध अंतराळ मोहिमा आणि भविष्यातील संधींची माहिती विद्यार्थ्यांना दिली. गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले, तर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य प्रा. लक्ष्मण शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला आणि सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजयकिरण नरवाडे यांनी केले. सूत्रसंचालन नंदिनी किर्तने यांनी केले, तर शुभम दुटके यांनी आभार मानले. यावेळी प्रा. राजेश्वर रैनी, प्रा. अक्षय वडजे, प्रा. महेश पाटील, प्रा. सचिन पाटील, प्रा. विवेक दराडे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. उपक्रमाच्या आयोजनासाठी संदेश वाघ, तेजस पवार, शिवम वसमतकर, नेहा भिसे आणि वेदांत दरडे यांनी विशेष पुढाकार घेतला.

# गवंडगाव येथे जुगार अड्डयावर पोलीसांची धाड;बारा जणांना अटक

देगलूर/प्रतिनिधी- गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जुगाराच्या अड्ड्यांवर पोलिसांनी कारवाईची धडक मोहीम सुरू केली आहे. देगलूर तालुक्यातील गवंडगाव येथे रविवारी पहाटेच्या सुमारास सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून तब्बल बारा जणांना जुगार खेळताना रंगेहात पकडले. घटनास्थळावरुन पोलीसांनी १ लाख ८ हजाराचा ऐवज जप्त केला आहे.

गवंडगाव येथे जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती देगलूर पोलीसांना मिळाली. रविवार दि.२० सप्टेंबर रोजी पहाटे पोलीसाच्या पथकाने सदरील जुगार अड्डयावर छापा टाकला. पैसे लावून तिरट नावाचा जुगार खेळत असतांना तुकाराम मरपळे (वय-२४), अविनाश गजरे (वय २८), सुरेश नरमुलके (वय ५०), मारुती सोनतोडे (वय ४७), गणेश वरखिडे (वय ४०), ज्ञानेश्वर साधू (वय ५४), दत्ता वरखिडे (वय ४०), दिलीप गोरे (वय ४०), शहाजी लुटे (वय ३५), प्रतीक नरवाडे (वय २३), ज्ञानेश्वर नरमुलके (वय २०), रमेश गुंडलवार (वय ३२), रा. गवंडगाव यांना ताब्यात घेतले. कारवाई ७ हजार ७६० रुपये रोख रक्कम व नऊ मोबाईल सह जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी पोलीस कर्मचारी संतोष राम बोंकलवार यांच्या फिर्यादीवरून देगलूर पोलीस ठाण्यात बारा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी किरण पोपळघट व प्रशिक्षणार्थी उपअधीक्षक वैभव पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# हदगावमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ; एकाच रात्रीत आठ दुकानांत चोरी

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरात चोरट्यांनी पुन्हा एकदा पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. शनिवारी मध्यरात्री पासून पहाटे. पर्यंतच्या अवघ्या काही तासांत शहरातील विविध भागांतील तब्बल आठ दुकानांचे शटर व कुलूप तोडून चोरट्यांनी लाखो रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

शहरातील प्रमुख व वर्दळीच्या भागातच चोरट्यांनी एकापाठोपाठ एक दुकाने लक्ष्य केल्याने व्यापारी वर्गात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारी रात्री सुमारे १२ वाजल्यापासून पहाटे पर्यंत चोरट्यांनी हदगाव शहरातील विविध भागात चोरीच्या घटना घडवून आणल्या. सर्वप्रथम स्टेट बँक ऑफ इंडिया समोरील परिसरातील सुमारे आठ मल्टीसर्विस दुकानांचे शटर व कुलूप तोडण्यात आले. दुकानांमध्ये प्रवेश करून चोरट्यांनी रोख रक्कम व इतर साहित्यावर हात साफ केला. चोरी करताना दुकानातील साहित्य अस्ताव्यस्त करण्यात आले. यानंतर चोरट्यांनी हदगाव-तामसा राज्य मार्गे रोडवरील राजेश बारचे शटर तोडल्याची माहिती समोर आली आहे. तसेच नांदेड-हदगाव- हायवे रोडवरील बीअर शॉपीलाही चोरट्यांनी लक्ष्य केले. एसटी बसस्थानका समोरील यादगिरी बारच्या मागील बाजूस असलेल्या देशी दारू दुकानासह इतर दुकानांमध्येही चोरीचा प्रयत्न अथवा चोरी झाल्याची माहिती समोर आली आहे. एकाच रात्री शहरातील वेगवेगळ्या प्रमुख ठिकाणी चोरट्यांनी सलग दुकाने फोडल्याने पोलिसांच्या रात्रीच्या गस्तीबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. मुख्य रस्ते आणि वर्दळीच्या परिसरात चोरट्यांनी धाडसी पणे दुकाने फोडली असताना पोलिसांची गस्त कोणत्या भागात होती, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून विशेष उपाययोजना केल्या जात असताना एकाच रात्रीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर दुकाने फोडल्याची घटना घडल्याने सुरक्षा व्यवस्थेचा मुद्दाही ऐरणीवर आला आहे. घटनेची माहिती मिळताच अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, हदगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी श्वान पथक व फिंगरप्रिंट तज्ज्ञांना पाचारण करून घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे संकलित करण्यास सुरुवात केली आहे.दरम्यान, चोरीच्या घटनांशी संबंधित परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असून चोरट्यांच्या हालचाली, त्यांचा मार्ग आणि वाहनांची माहिती मिळविण्याचा प्रयत्न पोलिसांकडून सुरू आहे.

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१३२८/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१६/९/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **अब्दुल फारुख पि.अब्दुल रज्जाक** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६५६/५१ गट क्र.६६२ प्लॉट क्र.५१** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मुहिबउल्ला बेग पि.करामतुला बेग** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ११७३/२०२६ दि.१२.८.२०२६, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- २० फूट रुंद रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट क्र.५२, उत्तरेस :- प्लॉट क्र.५८, दक्षिणेस :- २० फूट रुंद रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१३२७/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१६/९/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **गणेश राजाराम वंटनकर** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१५०१ पैकी भागावर गट क्र.-- प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **राजाराम मल्लू कोळी** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- शपथपत्र/सम्मतीपत्र/वाटणीपत्र, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- देविदास बापून्या पवार यांची जागा, पश्चिमेस :- संभा राजाराम वंटनकर यांचा हिस्सा, उत्तरेस :- संजय राजाराम कोळी यांची जागा, दक्षिणेस :- रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१३२६/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१६/९/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **नंदाबाई भ्र.साहेबराव बारसे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **४८१/७९ नविन क्र.२/८५३ गट क्र.-- प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **सविता भ्र.काशिनाथ अस्वरे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १३०६/२०२० दि.८.१०.२०२०, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- विजय संभाजी देशमाने यांची मोकळी जागा, पश्चिमेस :- नंदाबाई साहेबराव बारसे यांची जागा, उत्तरेस :- आनंदा हिरामण पांचाळ व नामदेव देवराव भोसले यांचे घर, दक्षिणेस :- १५ फूट रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१३२५/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१६/९/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **नंदाबाई भ्र.साहेबराव बारसे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **४८१/१०२ गट क्र.५१६ नविन क्र.२/८५२ प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **आनुसयाबाई भ्र. मारोतराव कवठेकर** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १८२/२०१९ दि.१४.२.२०१९, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- साहेबराव साखरे यांची जागा, पश्चिमेस :- विश्वनाथ निकम यांची जागा, उत्तरेस :- चेनापूरकर यांची जागा, दक्षिणेस :- १५ फूट रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१३२४/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१६/९/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **सखाराम साहेबराव बारसे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६७५/E-5 गट क्र.५३६ प्लॉट क्र.5-E** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **१) रामजी उर्फ रामराव अंबाजी कानोडे, २) लक्ष्मण अंबाजी कानोडे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ११२३/२०२० दि.२३.९.२०२०, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.३८, पश्चिमेस :- प्लॉट क्र.**E-3**, उत्तरेस :- प्लॉट क्र.**E 4** व **E 6**, दक्षिणेस :- १५ फूट रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१३२९/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१६/९/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **अब्दुल मतीन अब्दुल वाहेद कुरेशी** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **९७८/३ गट क्र.गावठाण प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **खतीब अब्दुल खासिन अमीरहसन मिरहसन अब्दुल जब्बार** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- २/६५४३/२०२६ दि.७.७.२०२६, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- सज्जादअली आबेदअली यांची जागा आहे, पश्चिमेस :- अ.जलील अ.रहेमान यांची जागा आहे, उत्तरेस :- रोड आहे, दक्षिणेस :- अजीजोद्दीन यांची जागा आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

# जमीन नगरपरिषदेची;मालकी मात्र दुसऱ्यांच्या नावावर!

## किनवटच्या सरकारी जमिनींच्या नोंदी संशयाच्या भोवऱ्यात

किनवट/प्रतिनिधी-किनवट शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१-अ लगतच्या मोक्याच्या जमिनींच्या मालकीवरून आता नगरपरिषद प्रशासनासमोरच मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. शहराच्या सार्वजनिक वापरासाठी, क्रीडा संकुलासाठी अथवा नगरपरिषदेच्या मालकीच्या म्हणून अभिलेखात असलेल्या जमिनी कालांतराने पांढरपेशाच्या नावे झाल्या कशा? याचे मूळ अभिलेखातील नोंदी आणि थेट हस्तांतरणाचा हिशोब घेण्यासाठी किमान आतातरी नगरपरिषद प्रशासन हस्तक्षेप करून गमावलेल्या मालकीच्या मालमत्ता परत घेण्यासाठी पुढे येणार का? असा सवाल रखडलेल्या महामार्ग रुंदीकरणाच्या कामासाठी अतिक्रमण हटाव मोहीम युद्ध पातळीवर सुरू होण्याच्या पुर्वसंध्येला समोर आला आहे.

किनवट नगरपरिषदेच्या कार्यकक्षेतील क्रीडा संकुलासाठी विकास आराखड्यात राखीव असलेल्या जागेपैकी सुमारे पाच हजार चौरस फूट जागेबाबत तत्कालीन माजी नगराध्यक्षांनी १९७३-७४ मध्ये अकबर अली जिवाणी या सद्गृस्तांकडून खरेदीखत केल्याची धक्कादायक माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. सन १९९५ च्या काळात मात्र नगराध्यक्षपदावर असताना त्याचा पुरेपूर फायदा घेऊन सदरील जमीनीच्या फेरफारासाठी प्रकरण दाखल करण्यात आले असता, तत्कालीन नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी जमीन नगरपरिषदेच्या मालकीची असल्याचे खातरजमा झाल्यानंतर सदरहू मालमत्तेचा फेरफार करता येणार नसल्याचे ठणकावून सांगत प्रकरण फेटाळल्याचेही सूत्रांद्वारे कळविण्यात आले आहे. यातील तथ्येतेपर्यंत पोहोचण्याची आता नामी संधी आली असून ती जागा रिकामी करुन दिल्याशिवाय महामार्गाच्या रुंदीकरणाचा मार्ग मोकळा होणार नाही. २०१३-१४ मध्ये नगरपरिषदेच्या कर आकारणी रजिस्टरमध्ये नगराध्यक्षाचे नाव नोंदवून जमीन ताब्यात घेण्यात आल्याचा आरोप नगरपरिषद वर्तुळातून करण्यात आला होता तो आजही ऐकायला मिळतोय. पुढे या जागेवर मोठी इमारत उभारण्यात आल्याचेही सांगण्यात येते. विशेष म्हणजे, या मालकीविषयक वादाला न्यायालयीन वळण मिळाले असून, संबंधित जमीन अकबर अली जिवाणी यांच्या मालकीची नसल्याचे जिल्हा न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या निकालांतून स्पष्ट झाल्याचा अनेकांनी दावा केल्याची बाब ऐकायला मिळते. त्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या नावावर झालेली



नोंद, त्यानंतर उभारलेले बांधकाम आणि त्यामागील प्रशासकीय प्रक्रिया यांची वैधता तपासण्याची गरज या निमित्ताने अधोरेखित होत आहे.

नगरपरिषदेच्या मालकीच्या जमिनीतील हिराणी यांच्या भूखंडापुरते प्रकरण सिमित नसून नगरपरिषदेच्या अनेक मालमत्तांमध्ये अशाच प्रकारे पांढरपेशी नेत्यांनी न.प.ची सत्ता काबीज करून भूखंड घोटाळा घडवून रेकार्ड रजिस्टर मधील नोंदी बदलल्या गेल्याचा धक्कादायक प्रकार पुढे आला आहे. कारण महामार्गालगतच्या मोक्याच्या जागांवर उभ्या राहिलेल्या व्यावसायिक इमारतींकडे पाहताना जमीन कोणाची, या प्रश्नापेक्षा जमीन कोणाच्या नावावर कशी गेली ? हा प्रश्न अधिक बोचरा ठरतो. नगरपरिषद प्रशासनाने संबंधित सर्व जुन्या मालमत्ता नोंदी, फेरफार, कर आकारणी रजिस्टर, खरेदीखते, न्यायालयीन निकाल आणि प्रत्यक्ष ताबा यांची स्वतंत्र छाननी करून एकदाची वस्तुस्थिती जगजाहीर करावी, अशी मागणी विकासप्रेमींकडून करण्यात आली आहे. कारण प्रश्न आहे राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटवून रुंदीकरणाचा.

### नदीत पोहण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्याचा मृतदेह सापडला

नांदेड/प्रतिनिधी-गोदावरी नदीत पोहण्यासाठी गेलेल्या दोन अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. कालपासून शोध सुरु असलेल्या दिपक सोळंके याचा मृतदेह आज सकाळी सापडला आहे.

मातोश्री प्रतिष्ठाण येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या बजरंग बिरु येडूरे (वय १८) रा.किनी ता.देगलूर व दीपक मारोती साळुंके (वय २०) रा. बाऱ्हाळी ता.मुखेड हे दोघेजण रविवारी गणेश विसर्जनासाठी काळेश्वर येथे गेले होते. गणेश विसर्जनानंतर गोदावरी नदीच्या पात्रात दोघेजण पोहण्यासाठी गेले असतांना पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला. रविवारी बजरंग येडुरे याचा मृतदेह जीवरक्षक दलाने शोधून काढला. परंतु दिपक सोळुंके याचा मृतदेह सापडला नव्हता. आज (सोमवार) सकाळी जीवरक्षक दलाने त्याचा मृतदेह नदीच्या पात्रातून शोधून काढला आहे.

## कंधारच्या स्वयंभू सत्य गणपती मंदिरात चोरी

कंधार/प्रतिनिधी-कंधारच्या शिवेवर नवसाला पावणारा म्हणून प्रसिद्ध असलेल्या स्वयंभू सत्य गणपती मंदिरात दि. २० सप्टेंबरच्या रात्री चोरीची घटना घडली. अज्ञात चोरट्यांनी मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील रोकड लंपास केली. दानपेटी फोडल्यानंतर ती मंदिराच्या बाहेरील आवारात फेकून देण्यात आली. या घटनेमुळे परिसरातील भाविकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.




सत्य गणपती मंदिराला भाविकांची मोठी श्रद्धा असून, नवसाला पावणारा गणपती म्हणून या मंदिराची ओळख आहे. श्रावण महिना आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. त्यामुळे दानपेटीत नेहमीपेक्षा अधिक रक्कम जमा झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.मंदिराचे ट्रस्टी तथा संस्थेचे सर्वेसर्वा मोहन महाजन यांनी सांगितले की, मंदिरातील दानपेटी साधारणपणे दर महिन्याला उघडण्यात येते. त्यावेळी अंदाजे २० हजार रुपये रक्कम जमा होत असते. मात्र, यंदा श्रावण महिना व गणेशोत्सवामुळे भाविकांची संख्या मोठी असल्याने दानपेटीत यापेक्षा अधिक रक्कम असण्याची शक्यता आहे.चोरीची घटना लक्षात येताच मंदिर व्यवस्थापनाने कँधार पोलिसांना माहिती दिली आहे. वृत्त लिहीपर्यंत पोलिसांकडून गुन्हा नोंद झाल्याची अधिकृत माहिती मिळालेली नव्हती. चोरी करणाऱ्या अज्ञात चोरट्यांचा शोध घेऊन मंदिरातील चोरीचा तपास लवकरात लवकर करावा, अशी मागणी भाविकांकडून होत आहे.दरम्यान, घटनेची माहिती मिळताच कँधार नगरपालिकेचे नगराध्यक्ष शहाजी नळगे यांनी सत्य गणपती मंदिरास भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी माजी नगरसेवक गणेश कुंटेवार, मंदिराचे ट्रस्टी मोहन महाजन यांच्यासह भाविक उपस्थित होते. मंदिर परिसरातील सुरक्षेच्या उपाययोजनांबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.

## राज्यात पुढील तीन दिवस पावसाचा जोर!

### नांदेडसह अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट

मुंबई/प्रतिनिधी- देशाच्या काही भागांत मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाला असला, तरी नांदेडसह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मात्र पुढील तीन दिवस विजांच्या कडकडाटासह मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. प्रशासनाने पुढील तीन दिवसांसाठी अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे.

देशात यंदा सरासरीच्या तुलनेत पावसाची तब्बल १५ टक्के तूट नोंदवली जात असतानाच नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी आता परतीचा प्रवास सुरू केला आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) २१ सप्टेंबरपासून राजस्थान, हरियाणा आणि पंजाबच्या काही भागांतून मान्सून माघारी फिरल्याची अधिकृत घोषणा केली आहे. २१ सप्टेंबर रोजी विदर्भ, मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि दक्षिण महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज आहे.गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, हिंगोली, परभणी, नांदेड, नाशिकचा घाट परिसर, अहिल्यानगर, पुण्याचा घाट परिसर, सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांना आज यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागांत काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता आहे.ठाणे, रायगड, जळगाव, छत्रपती संभाजीनगर आणि बीड जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी पडण्याची शक्यता आहे. उद्या, २२ सप्टेंबर रोजी राज्यातील पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांसह मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील अनेक भागांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, अमरावती, अकोला, बुलढाणा, हिंगोली, वाशीम, यवतमाळ, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूरचा घाट परिसर तसेच रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथे विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे.नाशिक, पालघर, मुंबई, ठाणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांत ढगाळ वातावरण राहून काही ठिकाणी तुरळक सरी कोसळण्याचा अंदाज आहे.

## यशवंत पाध्ये स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्रातील संपादकांचा गौरव

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र संपादक परिषद मुंबईचे संस्थापक, ज्येष्ठ पत्रकार व संपादक स्व. यशवंत पाध्ये यांच्या स्मृतिदिनानिमित्त ४ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्रातील संपादक व ज्येष्ठ पत्रकारांचा गौरव करण्यात येणार आहे. परिषदेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्यातील नऊ विभागांतून निवडक संपादकांचा स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल-श्रीफळ व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात येणार आहे.



मुंबईतील शिवाजी पार्क येथील होरायझन टॉवर येथे परिषदेचे सचिव एकनाथ बिरवटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे, उपाध्यक्ष सुधीर जाधव, गजानन चव्हाण, दीपाताई पाध्ये, हेमंत सामंत, राजेंद्र मोहिते, गोरख तावरे, धोंडोपंत विष्णुपुरीकर, अरुण सुरूडकर यांच्यासह कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी सचिव स्व. अनंत ऊर्फ राजू पाध्ये यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. स्व. यशवंत पाध्ये यांनी २००६ मध्ये संपादकांना संघटित व्यासपीठ मिळावे, त्यांच्या प्रश्नांना वाचा फुटावी आणि संपादकांना योग्य सन्मान मिळावा, या उद्देशाने महाराष्ट्र संपादक परिषदेची स्थापना केली होती. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात येत आहे. परिषदेच्या माध्यमातून स्थानिक व प्रादेशिक वृत्तपत्रांच्या संपादकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून, पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाची दखल घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

## माजी मंत्री प्रा.ढोबळे यांनी केलेल्या अपमानास्पद वक्तव्याचा उमरीत निषेध

उमरी/प्रतिनिधी-नांदेड येथे मातंग समाजाच्या वतीने दि.१३ सप्टेंबर रोजी आयोजित अनुसूचित जाती उपवर्गीकरण समर्थन मोर्चात माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांनी बौध्द समाजातील महिला व मुली विरुद्ध लैंगिक अत्याचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या आक्षेपार्ह वक्तव्याचा उमरीमध्ये तीव्र निषेध करण्यात आला आहे.

प्रा.लक्ष्मण ढोबळे यांनी बौद्ध समाजातील महिलांविषयी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्या प्रकरणी तीव्र संताप व्यक्त होत आहे. उमरी शहरात आयोजित आंबेडकरी अनुयायांच्या बैठकीत तीव्र निषेध करण्यात आला. तसेच प्रा. ढोबळे यांच्यावर त्वरित कायदेशीर कार्यवाही करावी अशी मागणी करण्यात आली. लवकरच उमरी येथे अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी मोर्चा आयोजित करण्याचे ठरले आहे. सदरील बैठक माजी उपनगराध्यक्ष अनिल सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.या वेळी अरुण भद्रे, बौध्द महासभा तालुकाध्यक्ष शंकर सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीस पत्रकार डी. जी. तुपसाखरे, संदेश गायकवाड, ॲड. भीमराव सवई, अशोक झडते, राजेश सवई, भीमराव वाघमारे, रामदास शेबरे, संदीप लांडगे, गंगाधर गंगासागरे, वसंत सवई, के. एन. पवार, गंगाधर जोंधळे, बालाजी देवके, पत्रकार कैलास सोनकांबळे, आदीसह बहुसंख्य आंबेडकरी अनुयायी उपस्थित होते.

## आनंद जाधव यांची भाजप नांदेड महानगर उपाध्यक्षपदी नियुक्ती

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक आनंद जाधव यांची भारतीय जनता पक्षाच्या नांदेड महानगर उपाध्यक्षपदी तसेच प्रदेश कार्यकारिणी सदस्य (अ.जा.) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.



भाजपच्या संघटनात्मक बांधणीच्या पार्श्वभूमीवर आनंद जाधव यांच्यावर नांदेड महानगर उपाध्यक्षपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्याचबरोबर त्यांची प्रदेश कार्यकारिणी सदस्य (अ.जा.) म्हणूनही नियुक्ती करण्यात आली आहे.आनंद जाधव यांनी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेचे नगरसेवक म्हणून यापूर्वी काम केले असून, शहरातील विविध प्रश्नांशी त्यांचा सातत्याने संबंध राहिला आहे. पक्षाने सोपविलेल्या नव्या जबाबदारीच्या माध्यमातून संघटन मजबूत करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांशी संपर्क वाढविण्यासाठी ते प्रयत्नशील राहणार आहेत.या नियुक्तीबद्दल डॉ. कोकणे सर, ईश्वर (भाया) जाधव, संजय गौतमसुरे, गणेश शहाणे, सुनील कांबळे, शेख नदिम, शांतनू सावंत, प्रकाश इंगळे, बाळासाहेब गायकवाड, अशोक गवलवाड, वैभव गायकवाड, वैभव इंगळे, निलेश आप्पा, प्रकाश संपते, सुभाष धुरे, मुन्ना भालेराव आदींनी आनंद जाधव यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## साहिल वाकोडे प्रकरणात आयआयटी बॉम्बेची माफी

मुंबई/प्रतिनिधी-आयआयटी बॉम्बेतील विद्यार्थी साहिल वाकोडे याच्या आत्महत्येप्रकरणी संस्थेने यापूर्वी केलेल्या आरोपांबाबत माफी मागत आपली भूमिका मागे घेतली आहे. अधिकृत चौकशी पूर्ण होण्यापूर्वी साहिलने परीक्षेदरम्यान गैरप्रकार केल्याचा दावा करणे अयोग्य होते, अशी कबुली आयआयटी बॉम्बेने दिली आहे. दरम्यान, प्रा. सूर्यनारायण दुल्ला यांचे अधिष्ठाता पद तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. साहिलच्या मृत्यूनंतर आयआयटी बॉम्बेने जारी केलेल्या निवेदनात १८ सप्टेंबर रोजी झालेल्या मध्यसत्र परीक्षेदरम्यान साहिल मोबाईल फोनचा वापर करत असल्याचा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीच्या माध्यमातून प्रश्नांची उत्तरे शोधत असल्याचा दावा करण्यात आला होता. या घटनेनंतर त्याला समज देऊन वसतिगृहात पाठवण्यात आल्याचेही संस्थेने म्हटले होते.







राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ.रोहित पवार यांनी दुष्काळग्रस्त भागातील नुकसानीचा पाहणी दौरा सुरु केला असून नांदेड तालुक्यातील तळणी येथे शेतकऱ्यांच्या बाधावर जावून पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर उपस्थित होते.

## अपघातात होमगार्ड संदीप पिंगळे यांचा मृत्यू

उमरी/प्रतिनिधी-गणेश विसर्जनासाठी जाणाऱ्या एका होमगार्डचा मोटारसायकलच्या समोरा समोर झालेल्या धडकेत मृत्यू झाला. तर, दोन जण जखमी झाले आहेत. ही घटना रविवारी (दि.२०) सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास घडली. संदीप संभाजी पिंगळे (वय ३२) रा. सोमठाणा हे दुचाकीवर गणेश विसर्जनासाठी रविवारी सायंकाळी जात होते. समोरुन येणाऱ्या दुचाकीची समोरासमोर धडक झाली. या अपघातात संदीप संभाजी पिंगळे याचा मृत्यू झाला. तर राजेश बालाजी जाधव, (जि. प. सहशिक्षक तळेगाव) व उज्वला राजेश जाधव (रा. येडाळा, ता. उमरी) हे दोघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



पान १ वरुन

### एकात्मिक आदिवासी प्रकल्प...

भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी बी.सरवनन यांनी कार्यालयातील आर्थिक व्यवहार आणि ताळेबंदाची तपासणी सुरू केली. प्रत्यक्ष जमा-खर्च आणि बँक खात्यांतील व्यवहार यांचा ताळमेळ संशयास्पद असल्याचे निदर्शनास आल्यानंतर आर्थिक नोंदींची बारकाईने छाननी करण्यात आली. आणि मग समोर आलेले आकडे केवळ आकडे राहिले नाहीत; त्यांनी संपूर्ण यंत्रणेवरच प्रश्नचिन्ह उभे केले.आदिवासींच्या विकासासाठी मंजूर झालेला पैसा नेमका कुठे गेला? कोणाच्या आदेशाने गेला? कोणाच्या खात्यात गेला? आणि इतका मोठा व्यवहार सुरू असताना संबंधित यंत्रणा झोपली होती का? या प्रश्नांची उत्तरे आता तपासातूनच समोर येणार आहेत. कोट्यवधी रुपयांचा निधी, शेकडो धनादेश आणि अनेक खात्यांमध्ये झालेली कथित उलाढाल पाहता हा प्रकार केवळ एका व्यक्तीच्या कक्षेत घडला का, हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. प्रकल्प कार्यालयातील अधिकारी प्रेमसिंग बाबूसिंग आडे यांच्या तक्रारीवरून भगवान डवरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कारवाई सुरू असून, पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार तपास करीत आहेत. तपासाची दिशा आता केवळ आरोपीच्या टेबलापासून बँकेच्या व्यवहारांपर्यंत आणि तेथून लाभार्थ्यांच्या खात्यांपर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. कारण १६ कोटींच्या व्यवहाराला कार्यालयातील केवळ एकाच कर्मचाऱ्यांचा सहभाग पुरेसा वाटत नाही.

### भाविकांचा छळ किती दिवस?...

अशा गोष्टींशी शहर प्रशासनास काहीही देणं घेणं राहिललं असं वाटत नाही. तीर्थक्षेत्र परिसरातील सुविधा विषयी कोणतेच गांभीर्य आहे, असे वाटत नाही. दि. २० सप्टेम्बर रोजी गोबिंद बाग चौकातील एका विद्युत खांब्यामध्ये विद्युत प्रवाह उतरल्याने तिथे साचलेल्या पाण्यात वीजेचा प्रसार होऊन एका निष्पाप श्वानाचा बळी गेला आहे. जर अशी घटना अनेपक्षितपणे एखाद्या भाविकासोबत घडली असती तर मग हजुरसाहिब नांदेडची प्रतिमा काय राहिली असती? वरील घटनेवरुन स्थानीक शीख समाजात नाराजीचे वातावरण आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४